# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. शिसस/उशि/पुवि/२०२०-२१/महाडीबीटी/1246 दिनांक : २०.०४.२०२१

**तात्काळ/अत्यंत महत्वाचे**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : - विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांसाठी महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणेसाठी मुदतवाढ देणेबाबत...**

संदर्भ : - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/ शिष्य २०२०-२१/डीबीटी/५९०९ दि. १६.०४.२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. **सदरहू शिष्यवृत्ती योजनांसाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता पात्र असूनही अद्याप अर्ज केलेले नसतील अशा विद्यार्थ्यांसाठी महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज करण्यासाठी दि. ३०.०४.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता विद्यार्थ्यांना अर्ज भरणेसाठी ही शेवटची संधी देण्यात आलेली आहे. यापुढे मुदतवाढ देण्यात येणार नसून, पात्र विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांनी विद्यार्थ्यांना विविध सोशल माध्यमांद्वारे सूचना देऊन कळविण्यात यावे.**

विद्यार्थ्यांना दुसऱ्या हप्त्याचा शिष्यवृत्ती लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची उपस्थितीबाबतची माहिती नमुद करुन विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्जावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी. ईन्स्टिट्यूट लॉगीन वरुन उपस्थितीबाबतची माहिती नमुद करुन शिष्यवृत्ती अर्ज पुढील टप्प्यावर पाठविल्याशिवाय, संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण होत नाही.

तसेच सद्यस्थितीत उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांचे लाभ वितरण सुरु झालेले आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन त्यांचे अर्जांची स्थिती तपासावी डीडीओद्वारे लाभ वितरीत केल्यास रीडीम बटण सक्रिय होते. सदर रिडीम बटण दाबण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना विविध सोशल माध्यमांद्वारे तातडीने सूचना देण्यात याव्यात शिष्यवृत्ती मंजूर विद्यार्थ्यांना महाडीबीटी व पीएफएमएस प्रणालीद्वारे आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यात येतात. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचे बँक खातेशी आधार संलग्न नाही अशा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती लाभ मिळणेसाठी तातडीने बँक खातेशी आधार संलग्न करावे.

आधार लिंक बँक खात्यात लाभ देण्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांनी रीडीम बटणावर क्लिक करणे आवश्यक आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज करतेवेळी विनाआधार या पर्यायाचा वापर करुन, महाडीबीटी पोर्टलद्वारे शिष्यवृत्तीचे अर्ज भरले आहेत अशा विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रोफाईल लॉगीन करुन आधार क्रमांक अपडेट करुन घ्यावा. शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्यांना त्यांचे आधार लिंक असलेल्या बँक खात्यामध्ये देण्यात येणार आहे. सदरची बाब संबंधित विना आधार विद्यार्थ्यांच्या तातडीने निदर्शनास आणावे.

**तसेच महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त आणि प्रलंबित ऑनलाईन अर्ज आणि रिडीम बटणासंबंधीची सर्व कार्यवाही विद्यार्थ्यांनी आणि विद्यापीठ /संस्था / महाविद्यालयांनी मुदतीमध्येच पूर्ण करावी. विद्यापीठ /संस्था / महाविद्यालय यांमधील एकही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीबाबत माहिती न मिळाल्यामुळे शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव, महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.**

(डॉ. संजय जगताप)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.